# योग महाविद्यालय, बारामती

**योगेन चित्तस्य पदेन वाचां । मलं शरीरस्य च वैद्यकेन ॥**
**योऽपाकरोत्तमं प्रवरं मुनीनां । पतञ्जलिं प्राञ्जलिरानतोऽस्मि ॥**
**राजा भर्तृहरी ( वाक्यपदीय ग्रंथ )**

ज्यांनी योग शास्त्र विस्तृतपणे सांगून त्याच्या अभ्यासाद्वारे चित्ताचे, पदेन् म्हणजेच व्याकरण शास्त्र सांगून वाणीचे तसेच आयुर्वेद शास्त्र सांगून शरीराच्या अशुद्धींचा नाश केला, अशा महान पतंजली मुनींना माझा दोन्ही कर जोडून नमस्कार असो.

**ॐ सर्वे भवन्तु सुखिनः।**
**सर्वे सन्तु निरामयाः।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु।**
**मा कश्चित् दुःख भाग्भवेत्॥**
**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः॥ ( बृहदारण्यक उपनिषद )**

सगळे सुखी होवो, सगळे रोगमुक्त राहो, सगळे चांगल्या, मंगल घटनांचे साक्षिदार बनो, आणि कोणाच्या वाट्याला दुःख ना यावं···

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**
**ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ॥ ( ईशोपनिषद् )**

सच्चिदानंदस्वरूप परब्रह्म सर्व प्रकारे पूर्ण आहे आणि हे दृश्य जगत् सुद्धा पूर्णच आहे. जरी पूर्ण परब्रह्मातून हे पूर्ण जगत् व्यक्त स्थितीस आलेले असले तरीही ह्या पूर्ण ब्रह्माच्या पूर्ण स्थितीला बाधा येत नाही. ते आहे तसेच पूर्ण राहते.